# प्रभुतरुण

| वर्ष ५० | अंक १२ | मुंबई | जून, २०१७ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

( *स्थापना :* तारीख २५ ऑगस्ट १९२३ ) **तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*सहाय्यक संपादक:* **त्वरिता दळवी, राजेश नवलकर, भक्ती शेटचे**

*संपादकीय*

## यशस्वी शिबीर

—सुहासिनी कीर्तिकर

**कृतज्ञ स्मरण**



**कै. विहंग नायक**

चिं. वि. जोशी यांच्या चिमणरावावरच्या लेखनात गंमतशीर उल्लेख आहे. दारावरच्या पाटीवरील नावापुढे 'एम्. एफ्.' ही पदवी लावली होती. 'एम्.एफ.' म्हणजे काय? कोणती बरं ही पदवी? 'एम्. एफ.' म्हणजे 'मॅट्रिक फेल'! अहो, त्याकाळी मॅट्रिकच्या परीक्षेला बसणं म्हणजे मोठंच अटकेपार झेंडे लावण्याजोगं होतं. पण हळूहळू 'गतीचा कायदा' पाळत शिक्षणाचे खरंच आज अटकेपार झेंडे फडकू लागलेत. अनेक दिशांनी जगण्याच्या, अनेक तऱ्हांनी सजलेल्या अनेक डिग्र्यांचे डोंगर प्रत्येकजण सर करतोय. सध्या 'बिझनेस मॅनेजमेंट'चे क्षेत्र जोसात आहे. पण होतं काय; की पदव्या हातात असूनही स्वतंत्र धंदा करायचा तर; वेगळीच जिद्द, वेगळीच कार्यपद्धती अन् वेगळाच यशस्वी मंत्र अंगी असावा लागतो. अनेकांना काहीतरी उद्योग करून 'उद्योगपती' व्हावसं वाटतं. त्यासाठी काय काय लागतं करायला?, काय करायला हवं?, मानसिकता कशी हवी?... याचंही कुणीतरी जाणत्यांनी बोट धरून मार्गदर्शन करायला हवं ना? आपल्या 'पाठारे प्रभू महिला समाजा'ने आपली शतकोत्तर वाटचाल करताना ही काळाची पावलं ओळखली. त्या पावलांबरहुकूम आपलं पुढारलेलं पाऊल टाकलं. २१ मे रोजी खारच्या पाठारे प्रभू ज्ञाती सभागृहात एक दिवसीय उद्योजकता शिबीर आयोजित केलं.

या शिबीरात ऐंशीच्या संख्येने शिबीरार्थी सहभागी झाले. हा प्रतिसाद अपूर्वच म्हणायला हवा. 'केल्याने होत आहे रे, आधी केलेचि पाहिजे' याचं प्रत्यंतर अशावेळी आयोजकांना आलं असेल. हे 'केलेचि पाहिजे' किती प्रकारचं? सुरूवातीला नावनोंदणी, नोंदणीची रीतसर पावती देणं, नाश्ताजेवणाची सोय करून 'कुपन्स' देणं, मार्गदर्शक मिळवणं, त्यांचा क्रम लावणं, त्यांनी केलेल्या प्रात्यक्षिकांचं थेट पडद्यावर चित्रण करणं, मुख्य म्हणजे अधेमध्ये कुठेही वेळ वाया न घालवता एका पाठोपाठ 'सेशन्स' घेणं... बापरे' सोपी गोष्ट नव्हे महाराजा! पण सौ. नीता सेंजित यांच्या अध्यक्षतेखाली वावरणाऱ्या महिला समाजाच्या सर्व सदस्यांनी अपार मेहनत घेऊन, शिस्तशीर कार्यवाही केली. महिला समाजाच्या विश्वस्तांची, सल्लागारांची याला साथ होतीच. काळानुसार बदलत अशा शिबीराचं आयोजन करण्यात महिला सामाजानं खरोखरीच दूरदृष्टी दाखवलीय.

काय, काय झालं या शिबीरात? अगदी ठोक तपशील द्यायचा तर विश्वस्त, सल्लागार, अध्यक्षांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून उद्घाटन झालं. गणेशवंदना सौ. रोनिका विजयकरांच्या सूरात असल्याने श्रोत्यांच्या मनात ती रिघली. त्यानंतर महिला समाजाच्या अध्यक्षा सौ. नीता सेंजित यांनी आपले मनोगत व्यक्त करून उपस्थितांचे स्वागत केले. यावर्षी विशेष म्हणजे महिला समाजाच्या शिवणवर्गाला १०० वर्षे झाली. सौ. उर्वशी धराधर यांच्या प्रयत्नांनी रोटरी क्लबतर्फे या शिवणवर्गाला तीन इलेक्ट्रिक मशिन्स देणगीदाखल मिळाली. ही मशिन्स योग्य तऱ्हेने हाताळणारे शिक्षक आपल्या ज्ञातीत असतील तर त्यांनी

(पान २ कॉलम १ वर)

*विस्तारीत संपादकीय*

## Come June, Come Rain

**- Vaijayanti Kirtikar**

I realize it is raining outside when my 2 year old comes asking for 'Amazaa', yes that is her take on the word umbrella! So almost every second day I have these boxes coming in from Amazon with goodies ordered online. When I am not at home, these deliveries land up at my faithful neighbour's house who cannot resist saying "oh, she too is an Amazon fan just like mumma" every time they hear the little one say 'Amazaa'! How do I tell these ignorant souls without being judged that Amazon has been my loyal best friend for the past few years only to be closely followed by Google, Facebook and the husband, yes in that order.

My boss says I suffer from a short attention span. I always tell him it is just that I am good at handling distractions. But this is one of those times when I realize that just like the leap year, he also is right once in 4 years. I will handle the Amazon distraction later, back to the rain. I am sure everyone has their own rain ghost memory – memory so strong that it has left an invisible mark on you and can never be forgotten. My earliest ghost memory is of my interview for admission to kindergarten school. The teacher asked me which colour is this; pointing to a plastic bunch of grapes and I replied 'हिरवा'. Disappointment was writ all over her face. Then she made me write A-Z 3 times and she kept on repeating I will not let you go home till you write in legible writing. Jump cut to the present day and the teacher at the nursery school tells me 'Speak to your daughter in English, else she will not learn the language'. So much for changing times!

Rain, rain, yes I keep reminding myself, it is rain I want to write about. Rain takes me back to jumping in the puddles of water, rather potholes filled with water on the way to school with my sister. This joy is still unmatched. Rain for us then meant the tiny lane getting clogged and creating a dirty river to jump into. It was all about paper boats and wet socks. Teenage days were mixed with a feeling of melancholy when it rained. I had to sit indoors with book in hand, supposedly studying, while the rain busily painted everything green. I can safely attribute my poor academic performance to the music of rain drops on the window pane. Things did not change much when I started working. Every time it rained when I was at work, a feeling of severe longing to get out of office would gnaw its ways to and fro from the heart to the brain. Think harder, my mind would tell my brain, you feigned illness to get out of office early yesterday, what will it be today? Sometimes, no not sometimes, almost always my brain would surprise me by coming with brilliant excuses! Not to mention that the brain would take the BFF's (Google) help liberally.

The best part of the rainy season is the unexpected holidays. When the entire city halts and there is no way you can make it to office, all you do is guilt freely enjoy the rain. I remember once receiving a call from one of my colleagues to inform me that the company has declared a holiday today on account of the heavy rain. Happiness knows no bounds when you hear such good news, never mind that I was already in office! I pleaded and even threatened my colleague to not mention to anyone that I was in office, I was going to leave

(पान २ कॉलम ३ वर)

संपादकीय

(पान १ कॉलम २ वरून)

सहकार्य करावे; योग्य वेतन त्यांना दिले जाईल-; असे नीताताईंनी जाहीर केले.

यानंतर खऱ्या अर्थाने शिबीराला सुरुवात झाली ती श्री. सुदेश प्रबोध देसाई यांच्या मार्गदर्शनाने. त्यांच्या अनुभवी, यशस्वी मार्गदर्शनामुळे सुरूवात तर छानच झाली. शिबीरार्थींशी त्यांनी थेट संवाद साधला. संधी शोधण्याची जाण म्हणजे उद्योजकता. उद्योजक व्हायचं असेल तर मेहनत, भांडवल, माणसं जोडणं, धंद्याविषयी तत्पर माहिती असणं वगैरे वगैरे गोष्टी या नंतर येतात. आधी काय येतं?... तर त्याविषयी स्वप्न पाहणं. 'बिझीनेस स्टार्टस् फ्रॉम ड्रीम्स' हेच खरं. मग अपयशाची भिती वाटत नाही, आत्मविश्वास वाढीला लागतो असं सांगताना त्यांनी आजूबाजूची अनेक औद्योगिक घडामोडींची उदाहरणं दिली. त्यांनी साधलेला संवाद व्यावसायिक शिबीरासाठी अत्यंत उपयुक्त आणि मार्गदर्शक ठरला.

यानंतर झाले ते 'चॉकलेट बुके'चे प्रात्यक्षिक. सौ. बिंबा नायक यांची सून सौ. गौरी हिरेन नायक यांनी बिंबाताईंच्या सहकार्याने ते सादर केले. गौरीताई 'चॉकलेट बुकेज'चे वर्ग चालवितात. एका किलोत साधारण ८० चॉकलेट्स होतात. आठ चॉकलेटस्‌पासून अनेक चॉकलेटस्‌पर्यंत हे सजावटीचे गुच्छ तयार करता येतात. ओला ओयासिस पाया (बेस) म्हणून घेऊन फॉइल, स्क्यूअर्स, बास्केटस्, रिबीन, सजावटीचे कागद यांच्या सहाय्याने हे गुच्छ कसे सजवावेत याचे छान प्रात्यक्षिक पहायला मिळाले. बाजारातील या गुच्छांच्या मागणीविषयी काही खुलासा केला गेला. कम्पाऊण्ड चॉकलेटस् वितळत नाहीत, गुच्छ करताना रिकाम्या जागा कशा भराव्यात.. आदी माहिती या प्रात्यक्षिकात मिळाली.

उद्योग रीतसर सुरू करायचा तर; त्याची नोंदणी करावी लागते. 'केव्हीआयसी'च्या संचालिका सौ. प्रज्ञा मिलिंद जोगळेकर यांनी स्वयंरोजगारावर भाषण केले. अनुभवाची शिदोरी त्यांनी श्रोत्यांपुढे ठेवली. गंमत म्हणजे त्यादिवशी त्यांच्या लग्नाचा वाढदिवस होता. त्याचे औचित्य साधत बिंबाताईंनी केलेला चॉकलेट गुच्छ त्यांना खास भेट देण्यात आला. वाढदिवसाची अनोखी भेट!

श्रीम. छाया दीपक तळपदे या विविध दागिन्यांच्या घडणीसाठी आपल्या ज्ञातीत मशहूर आहेत. त्या जे. जे. स्कूल ऑफ आर्टस्‌च्या सुवर्णपदक विजेत्या आहेत. १५ वर्षांपूर्वी फक्त १३० रुपयांपासून सुरुवात करून आज त्यांच्या उद्योगाची उलाढाल प्रचंड आहे. एस. एन. डी. टी. विद्यापीठात त्या दागिने घडणावळीचे (ज्वेलरी मेकींग) वर्ग घेतात. त्यांनी कुंदनचे दागिने कसे करायचे त्याचे नेटके प्रात्यक्षिक सर्व तपशीलासह दाखवले.

लघुउद्योगासाठी भांडवल लागते. त्यासाठी बँकेतून आपल्याच दीर्घ मुदतीच्या बचतीवर कर्ज कसे काढता येते, किंवा इतर काय, काय करता येते - याविषयी मार्गदर्शन केले सारस्वत बँकेच्या विभाग संचालिका नीता परुळेकर यांनी. आपल्या उद्योगासाठी होणारा सर्व आर्थिक व्यवहार करण्यासाठी स्वतंत्र खातेच असावे; हा त्यांचा सल्ला बहुमोलाचा होता.

या मार्गदर्शनानंतर होते बेसनापासून केलेल्या कलाकृतींचे प्रात्यक्षिक. श्री. कमलाक्ष कोठारे यांनी नारळ, केळे, फुले आदी कलाकृती करून दाखविल्या. आपल्या ज्ञातीत घरोघरी ही कला ज्ञात असल्याने आणि जेवणानंतरच्या सुस्तीमुळे या प्रात्यक्षिकाला थोऽऽडे रेंगाळलेले स्वरूप आले. अर्थात श्री. कोठारे यांनी सर्व स्पष्टीकरणांसह कलाकृती समरस होऊनच केल्या.

सौ. रीना मनिष धैर्यवान यांनी विविध मेणबत्यांचे प्रात्यक्षिक करून दाखवले. त्या 'पेपर वर्क' मध्येही माहीर आहेत. (त्याचे प्रदर्शन सभागृहात मांडले होतेच.) 'टाइम्स'मध्ये त्यांचा मेणबत्त्या तयार करण्यावर लेख प्रसिद्ध झाला आहे. मेणबत्त्या तयार करण्यासंबंधी २००४ मध्ये त्यांचे पहिले पुस्तक प्रकाशित झाले. त्यांच्या पुस्तकांवर त्यांचेच मुखपृष्ठ असते ही खासियत वाखाणण्याजोगीच. 'पेपर क्राफ्ट'चे त्यांचे दुकान वांद्रे येथे खूप चालते. व्यावसायिक दर्जा त्यांचा मान्य झालाय. त्यांचा भारतातील पहिल्या पाच महिलांमध्ये समावेश आहे. 'डायमेन्शन' ही त्यांची कंपनी आणि त्या या जोडीने शांपू, क्रीम वगैरेही क्लासमध्ये शिकवतात. 'क्राफ्ट कार्निवल' मध्ये सहभागी असतात. त्यांनी चंक्स कॅण्डल, जेल कॅण्डल, कॉफी बीन्स घालून अरोमा कॅण्डल, फ्लोटिंग मेणबत्त्या, बर्फाचा चुरा घालून वेगळ्या डिझाइन्सच्या कॅण्डल्स... आदी प्रात्यक्षिके करून दाखविली. बेसनाच्या कलाकृतींप्रमाणेच या सर्व तऱ्हेच्या कॅण्डल्स् प्रेक्षकांना हाताळून पाहाता आल्या. महत्त्वाचे म्हणजे ही प्रात्यक्षिके करताना 'मन की बात' त्यांनी केली. मुलांना योग्य वेळी स्वातंत्र्य द्या. केवळ शैक्षणिक प्रगतीला महत्त्व न देता त्यांच्या कलेला उत्तेजन द्या. हे त्यांनी स्वत:चा अनुभव सांगत केलेले मार्गदर्शन अत्यंत मोलाचेच होते.

आजकाल सर्व स्त्रियांचा आवडीचा विषय म्हणजे चेहऱ्याचे सौंदर्य खुलवणे. सौ. तृप्ती अनुराग तळपदे यांनी पार्टीला जातानाचे चेहरा आणि केस यांचे सुशोभन मॉडेल चैताली वैद्य यांच्यावर अनेक मोलाच्या सूचना देऊन करून दाखविले. दुबईलाही त्यांची प्रात्यक्षिके होतात. एस. एन. डी. टी. व्होकेशनल गायडन्समध्ये त्या शिकवतात. क्लिन्सिंग, टोनर, प्रायमर, मॉइश्चरायझर, फाऊंडेशन आदींचा वापर कसा करावा हे सांगत सांगत त्यांनी 'मेसी हेअर स्टाईल' आणि 'पार्टी मेकअप'चे प्रात्यक्षिक केले.

अगदी शेवटी प्रात्यक्षिक झाले ते 'शुगर क्राफ्ट'चे. बिंबा मनोज नायक यांनी ते करून दाखवले. जिलेटिन, आइसिंग शुगर आणि मार्गारिन यांच्या मिश्रणाने 'शुगर क्राफ्ट'चे मिश्रण केले जाते जे फ्रीजमध्ये दोन, दोन वर्षे टिकते. सर्व 'उत्तम साहित्य वापरा' हा संदेश त्यांनी दिला अन् मिश्रणापासून गार्डनिया, ऑर्किड, २४ पाकळ्यांचे पिओनी फूल, लिली आदी फुले बनवून दाखवली. या शिबीराला माझ्या ७ आणि १२ वर्षांच्या नातीही आल्या होत्या. त्यांनी एमसिलपासून दुसऱ्या दिवशी ही फुले करूनही पाहिली! शिबीराचा किती प्रभावी परिणाम हा!

सकाळी १० ला सुरू झालेल्या शिबीराची सांगता होता होता रात्रीचे ८ वाजले. उद्योजकाला मेहनत करावी लागते, तशी शिबीरार्थींनाही? पण अध्येमध्ये वेळ कुठेच वाया न घालवता झालेले हे शिबीर लांबले त्याला आयोजक काय करणार? प्रात्यक्षिकांना तेवढा वेळ द्यावा लागलाच. असो. सगळ्या मार्गदर्शकांचे स्वागत समाजाध्यक्षा नीता सेंजित यांनी केले. सूत्रसंचालन कार्यवाह पल्लवी कोठारे यांचे होते. अनेकांचा परिचय विश्वस्त वृंदा जयकर यांनी करून दिला; तर काहींचा उर्वशी धराधर यांनी करून दिला. उपाहार आणि जेवणाची व्यवस्था सुधीर धुरंधरांनी सांभाळली. त्यावेळी त्यांनी 'मोइतो' पेयही त्यांच्याकडून सगळ्यांना भेट दिले; तर वृंदा जयकरांनी दिलेल्या जिलेबीने गोडी वाढवली. आभार मानले उपाध्यक्ष साया नवलकर यांनी.

कालानुरूप असलेला महिला समाजाचा पहिलाच उपक्रम इथून पुढे राबवायचा तर समाज वेळेचेही व्यवस्थापन करेलच. (म्हणजे दोन दिवसीय शिबीर; किंवा प्रात्यक्षिकांची कपात वगैरे करून.) कारण १० ते ८ ही पूर्ण दिवसाची वेळ शिबीरार्थींना शारीरिक ताणाची वाटली. मात्र या शिबीराने त्यांना बहुमूल्य असे पुष्कळ काही दिले हे तितकेच खरे. अशा आणखी उपक्रमांसाठी पा. प्र. महिला समाजाला मन:पूर्वक शुभेच्छा. नीताताई; तुमच्या शिस्तबद्ध आयोजनाबद्दल तुमचं अभिनंदन.

विस्तारित संपादकीय

(पान १ कॉलम ४ वरून)

immediately before anyone caught me there. He did ask me where I was heading as all transport had come to a standstill and wouldn't be able to reach home. But who cares when you get a day off work and it is beautifully raining outside!

Rain does not only mean those lovely wet melodies or curling up with a hot coffee and book. It is time to explore your talent. Write a song yourself; sing it loud to the music of raindrops. Record the song, however, cheesy it is or harsh to the ears, and forward it to all your friends and enemies. No better way to know who your true friends are! Write a book yourself. Even if it is corny, send it to all your near and dear ones! Just like I am writing this piece of my take on rain even at the risk of losing some readers! Also no better way to know who our loyal readers are!

Take a look at the window pane. Lay a bet with your darker inner conscience on which raindrop will first reach the bottom. If that darker inner conscience wins, then you carry on with the work on hand, and if you win, voila, fun time! Make sure you win, change the drops you placed your money on if you think you are losing. After all the darker inner conscience does not have a say in this.

Pretend to wash your car in the rain, this tip is from my husband whose car stays unwashed otherwise. Let the rain do the job and you take the credit. Any unhygienic readers, you can try this washing tip on yourself too.

Let rain take over your entire self, allow yourself to be cleansed, body and soul. Listen to the patter of rain drops, let the smell of earth rejuvenate your senses, let all troubles and cares get carried away with the water. Don't teach your kids the rhyme 'Rain rain go away, come again another day'. Share your umbrella. Save a boyfriend for a rainy day, and another, in case it doesn't rain. Wear your ugly shoes, don't wash your jeans. Don't wipe your spectacles; ask for help to cross a road as you cannot see well. Try screaming louder than the thunder. When stuck in traffic, step out of your vehicle, try taking selfies with strangers. Lay on your stomach in a puddle and scream "I'm drowning". In short when life throws you a rainy day, play in the puddles.

Yellow umbrellas, Blue raincoats and Red shoes,
Dark sky, muddy puddles, Green grass and frogs croaking by;
Cancelled plans and empty coffee shops,
Rainbow up there and smiles down here;
A big wet puddle just down the lane,
And a big SPLASH-
I love the rain!

Some people feel the rain, others just get wet. - Bob Marley; What kind of people are you?

*

**कथाकली**

# जन्मजन्मीच्या गाठी

-सौ. जयमती जयपाल तळपदे

'ए रुमे' अशी हाक कानावर आली आणि मी गर्रकन मागे वळले. अशी हाक मारणारी एकच व्यक्ती म्हणजे माझी शालेय मैत्रीण मेरू म्हणजे समीरा. आणि मी रमीला म्हणून तिने मला मेरूच्या उलटे 'रुमे' करून टाकले. मेरु मला जवळ जवळ २५-३० वर्षांनी भेटत होती. ही माझी शाळेतील जीवश्च कंठश्च मैत्रीण. पण लग्नानंतर मी मुंबईबाहेर गेले. सुरुवातीला सर्व मैत्रिणींबरोबर पत्रव्यवहार होता. परंतु हळूहळू जबाबदाऱ्या वाढत गेल्या आणि सर्वांशी संपर्क तुटला. मेरुचे काम झटपट. तिने माझा फोन नंबर घेतला आणि बाकीच्या सर्व मैत्रिणींशी बोलून एका शनिवारी एकीच्या घरी भेटण्याचा कार्यक्रमही ठरवला.

एवढ्या वर्षांनी भेटल्यामुळे साहजिकच मी सर्वांची खुशाली विचारायला सुरुवात केली. गीतावर वेळ आली आणि ती रडायलाच लागली. मग थोड्या वेळाने तिने सांगायला सुरुवात केली. तिला एकच मुलगा. खूप कष्ट करून तिने आणि तिच्या नवऱ्याने त्याला शिकवून इंजिनियर केले. त्यानेही त्यांच्या कष्टांचे चीज केले. त्याला चांगल्या पगाराची नोकरीही मिळाली. मग एक चांगली मुलगी बघून त्याचे लग्नही करून दिले. सुरुवातीला सर्व नीट चालले होते. पण मग सूनेने हिचा मवाळ स्वभाव जोखला आणि गडबडीला सुरुवात झाली. बाजारहाट करून सर्व सामान घरात आणून टाकले की ते नीट लावयचेही काम ती करीत नसे. मनात असले तर स्वयंपाकाला मदत करी. नाहीतर मर्जीनुसार घरात न सांगताच बाहेर जेवून येई. अचानकच आधी पूर्वसूचना न देता हिचा मुलगा आणि सून बाहेर निघून जात. गीताने हौसेने एवढे दागदागिने तिच्यासाठी केले होते तर; ही साधे मंगळसूत्रही घालत नसे. कपाळावर कुंकूही नाही. या सर्वांचा गीताला अर्थातच मानसिक त्रास होई. आता तिला असे वाटायला लागले होते की ती मुद्दामच हिला डिवचण्यासाठी तिच्या मनाविरुद्ध वागते. खरं तर गीताही चांगली शिकलेली; पण सून तिला अगदी तुच्छतेने वागवते ती अडाणी असल्यासारखी. तिला स्वत:च्या उच्च शिक्षणाचा फार अभिमान आहे- इतके सांगून गीता थकून गप्प बसली.

आमच्या ग्रुपमध्ये मेरु म्हणजे अगदी विचारी, प्रत्येक गोष्टीचे विश्लेषण करणारी. त्यात विज्ञान शोधणारी. त्यामुळे शाळेतसुद्धा ती आमच्या ग्रुपची लीडरच होती. ती बोलायला लागली. ''गीता, तुझा पुनर्जन्मावर विश्वास आहे?'' ''होय'' गीताने म्हटले. 'मग मला सांग हीच सून तुझ्या नशिबी का आली? तूच मुली पाहिल्यास. मग तुम्ही दोघांनी हीच मुलगी का पंसत केलीत? एवढ्या छान छान मुली त्याला मिळू शकल्या असत्या. मग हीच का?'' ''माझं नशीब फुटकं. दुसरं काय? तेव्हाच दुसऱ्यापण दोन छान मुली सांगून आल्या होत्या. पण मुलाने ही पाहिली आणि त्याला लगेच ही पसंत पडली.'' गीता म्हणाली. त्यावर मेरु बोलायला लागली, ''हो ना? पुनर्जन्माच्या थिअरीप्रमाणे आपण त्याच लोकांच्या सहवासात येतो ज्यांचे आपण काही देणे लागत असतो. त्या सर्वांशी आपले ऋणानुबंध असतात. जन्मजन्मांतरी केलेले चांगले वाईट कर्म आपण या जन्मी फेडतो. अगदी त्याबद्दल आपल्याला काहीही आठवत नसेल तरीही. म्हणजेच आपल्याशी कुणी वाईट वागत असेल तर कुठल्यातरी पूर्वजन्मात आपण त्याच्याशी वाईट वागलेलो असतो.''

''अगं पण मी कुणाचे वाईट करणारी वाटते का?'' गीताने कळवळून विचारले, ''नाहीच मुळी. पण ते तू या जन्मीचे बोलत आहेस. गतजन्मांचे काय?'' मेरु उत्तरली. ''अगं, पण जे मला आठवतसुद्धा नाही त्याची मला या जन्मी शिक्षा का?'' गीताने विचारले. ''कारण काही कारणाने तू ते तेव्हा लगेच भोगू शकली नाहीस. न्यूटनच्या थिअरीप्रमाणे प्रत्येक क्रियेला इक्वल आणि ओपोझिट रिॲक्शन असते. त्यामुळे आपण केलेल्या प्रत्येक चांगल्या गोष्टीचे फळ चांगले व वाईटाचे वाईट असे वेगवेगळे मिळते. आपले एखादे चांगले वर्तन आपले दुसरे वाईट वर्तन पुसून टाकत नाही. म्हणून तर प्रत्येकाच्या आयुष्यात चांगले आणि वाईट असे दोन्ही प्रकारचे दिवस येतात. जेव्हा कुणीतरी आपल्याशी वाईट वागते तेव्हा हे समजून घ्यायला हवे की मी त्याला पूर्वी कधीतरी वाईट वागवले आहे. मग ते या जन्मी असो वा पूर्वजन्मी असो. म्हणजे त्या व्यक्तीला दोष न देता हे माझ्याच दुष्कर्माचे फळ आहे हे मान्य करायला हवे. एकदा हे मान्य केले की आपण त्या व्यक्तीला माफ करू शकतो. आणि मग आपले त्या व्यक्तीशी असलेले वागणे आपोआप बदलते. नाहीतर आत्ताही आपण त्या व्यक्तीचा रागराग करतो आणि पुढच्या जन्मासाठी संचित निर्माण करतो. आपले वर्तन बदलले की आपल्या जीवाची तगमग होत नाही. शिवाय आपल्यातील बदल नाही म्हटले तरी त्या व्यक्तीतसुद्धा बदल घडवून आणतो आणि अगदी नाही तसे झाले तरी आपण त्याला आहे तसे मनोमन स्वीकारतो. निदान आपले मन तरी शांत होते. व.पु.काळेंनी एका गोष्टीत सांगितले आहे, आपण येथे येतो ते आपले डेबीट बॅलन्स काढून टाकायला. त्यामुळे या जन्मीची दु:खे कुणाचाही राग, तिरस्कार न करता भोगावीत म्हणजे संचितातील डेबीट बॅलन्स आपोआप कमी होत जातो आणि पुढच्या जन्मासाठी आणखी काही वाढत नाही.'' मेरू म्हणाली.

''मेरू तुझ्या असल्या गोष्टींवर विश्वास आहे?'' मी विचारले, ''हा माझ्या विश्वासाचा प्रश्नच नाही. गीताचा पुनर्जन्मावर विश्वास आहे म्हणून मी तिला त्यातले तर्कशास्त्र सांगितले. त्यामुळे आपल्याला आपल्या आयुष्याकडे सकारात्मक दृष्टीने पहाता येते आणि आयुष्य थोडे सुकर होते. गीताच्या वैचारीक बैठकीप्रमाणे तिला हे स्पष्टीकरण पटणारे आहे. काय गं गीता, तुला हे पटले की नाही?'' ''हो गं, मेरू.'' नाण्याच्या या दुसऱ्या बाजूचा मी विचारच केला नव्हता. आता मीही विचार करते. की माझे काय चुकतेय, माझ्यात मला काय बदल करता येतील. परिस्थिती कशी बदलता येईल किंवा हाताळता येईल. एवढ्या पोथ्या वाचल्या, उपास तापास केले. पण परिस्थितीवर मात करण्याचा तोडगा, माझ्याच हातात होता हे कधी लक्षातच नाही आले. थॅंक्स मेरु आणि आता समजा, परिस्थिती नाहीच बदलली तरी मी आणि आमचे उर्वरीत आयुष्य आम्हाला जमेल तसे आनंदात घालवू.''

''पण मेरू, समजा गीताचा पुनर्जन्मावर विश्वास नसता तर?'' ''ए, आता ते पुढच्या वेळेस हं. आता मला उशीर होतोय. चल, चल, बाय, बाय.'' म्हणत मेरू पळत सुटली. मी तिच्या त्या धडपडत जाण्याकडे आ वासून पहातच राहिले. नंतर गीता मला म्हणाली, 'अगं मेरूचा नवरा पॅरालिसिसमुळे बिछान्यातच खिळून पडलाय. त्याचे सर्व मेरुच बघते. तसा एक माणूस पण ठेवलाय त्यांना बघायला. मेरूचा मुलगा कॅनडात असतो. त्याच्या बायकोला इथे यायला आवडत नाही. म्हणून तोही येथे येत नाही. हे दोघेच येथे असतात. ए, पण आता मला जाणवतंय, मी मेरूला तक्रार करताना कधीच ऐकले नाही. किती सहजपणे तिने ते स्वीकारले आहे. ती नेहमीच म्हणते ''what cannot be cured should be endured.'' आत्ता अर्थ कळला गं मला त्याचा. मी तिला कधी मुलाला किंवा सुनेला दोष देतानाही ऐकले नाही. ती म्हणते मरेपर्यंत जगणे तर आहेच. मग ते कसे जगावे एवढेच माझ्या हातात आहे... आनंदात की रडत रडत. आणि मी परिस्थितीला माझ्यावर मात करू देणार नाही. कुठल्याही परिस्थितीत मी आनंदातच जगेन. कारण माझं नाव आहे 'मेरू' म्हणजे अचल.

*

## अभिनंदन

साहित्य अकादमीतर्फे ११ जून रोजी बडोदे येथे होणाऱ्या बालसाहित्यावरील चर्चासत्रात डॉ. सुमन नवलकरांना भालचंद्र नेमाडेंनी निमंत्रित केले आहे. मराठी, सिंधी, गुजराती आणि कोकणी भाषेतील बालसाहित्यावर चर्चा होणार असून डॉ. सुमन नवलकर 'वेस्टर्न इंडियन लॅंग्वेज'च्या संदर्भात मराठी बालकवितांवरील पेपर हिंदीतून वाचणार आहेत.तसेच दुपारच्या सत्राचे अध्यक्षस्थानही त्या भूषविणार आहेत. अभिनंदन.

*

## हसरी रेखा

-प्रदीप कोठारे



# एक डाव बेझीकचा

-रसिक विजयकर

ऑफिसच्या कामासाठी मी हैद्राबादला गेलो होतो. विमानतळावर मला नेण्यासाठी तेथील स्थानिक अधिकारी आले होते. मला भेटताच त्यांनी शुद्ध मराठीतच विचारले, ''तुम्ही विजयकर म्हणजे पाठारे प्रभू ना? म्हणजे तुम्हाला बेझिक येत असेल?'' मी जरा उडालोच. त्यांनीच पुढे सांगितले ''अहो, मी काही वर्षे तुमच्या गिरगावात राहावयास होतो. आमच्या शेजारी तेव्हा कोणी विजयकर राहायचे. आधी आम्हाला कळायचे नाही यांच्या घरी दर रविवारी दुपारी एव्हढी वादावादी का होते? एकदा त्यांना भीत भीत विचारले तेव्हा त्यांनी सांगितले; ते बेझीकचा डाव मांडतात. त्यावरून ही सर्व बोंबाबोंब चालते.

फेब्रुवारी अंकात श्री. दीपक धैर्यवान यांचा 'बेझिक'वर लेख वाचला आणि गतस्मृती जाग्या झाल्या. टोपीवाला लेनमधील मामांचा प्रशस्त दिवाणखाना, ती रविवार दुपार. आई, बाबा, मोठे मामा, आजी, धाकटे मामा-मामी बेझिक खेळत आहेत. एक डाव झाला आहे, नेहमीप्रमाणे बाबा आईच्या नावाने तारपट्टीत खरडपट्टी काढीत आहेत, ''हातात पाने काय कुजायला ठेवता? हुकूम बाहेर काढायला काय झाले? अजून बेझिक खेळता येत नाही. लहान मार्क्स करता येत नाहीत?'' आणि आईचे नेहमीचे उत्तर, ''नाही, ही पाने आताच आली, मी पुढल्या डावाला काढणार होती'' बाबांचा शब्दांचा मार चुकविण्यासाठी आईची आणखी एक शक्कल म्हणजे, ''मी चहा टाकते, कोणाला पाहिजे?'' असे म्हणून किचनकडे पळणे. धाकटे मामा हा सगळा रागरंग शांत होण्यासाठी आपली तपकिरीची डबी बाबांपुढे करणार, वास्तविक दोघांचाही तपकिरीचा ब्रांड वेगळा वेगळा. पण अशा वेळी तपकीर कोठलीही चालायची! मामी हळूच म्हणणार, ''माझे हे राजा राणीचे वीस काढायचे राहिले.'' मामा गरजणार, ''वेड लागले आहे काय, अगं कोठे आहे, ती हुकमाची जोडी होती, चाळीस मार्क बुडाले ना!'', आजीच्या बाजूला सर्व नातवंडे बसली आहेत. हातात वही पेन्सील. वहीवर बेझीकचे सर्व मार्कस् लिहून काढीत आहेत. आजीला वेगवेगळ्या शंका विचारीत आहेत, आता आम्हाला पदोन्नती मिळाली आहे. या मोठ्यांमध्ये मार्क फिरवायला परवानगी मिळते. जो पक्ष हरायला येत असे तो बहुतेक आमच्या नावाने शंख करत असे, ''हा मार्क्स बरोबर फिरवत नाही, विसरतो वाटतो, नाहीतर आपण एवढे मागं कसे?'', आता आम्हाला बेझीकचा खेळ पाठ झाला आहे. सुट्टीच्या दिवसात सकाळ संध्याकाळ आम्हा मुलांचा अड्डा जमू लागला आहे. हे सर्व आठवले आणि अस्मादिकांची परत एकदा बेझिक खेळण्याची हुरहूर वाढीस लागली. शेवटी शोभा व रंजन विजयकरना विचारले. ती माझ्या एवढीच उत्साही होती. तिची अट एकच, ''खेळायला बसायचे तर आमच्याकडे. बाकी सर्वांना विचारण्याचे काम तू कर.'' फोनाफोनी चालू झाली. ही तारीख, ती तारीख करता करता ६ मे २०१७ वर शिक्कामोर्तब झाले. जयपाल तळपदे, नंदकुमार व सुहास विजयकर, प्रतिमा व विनोद प्रधान, रश्मी व प्रमोद जयकर, अस्मादिक रसिक व भारती विजयकर, दीपक व नीलन धैर्यवान इ. गोतावळा तयार झाला. सर्वजण आता ''सिनियर सिटीझन'' पोहोचल्यामुळे व कित्येक वर्षात बेझीकला हात न लावल्यामुळे काहीसे साशंक होते. प्रत्येकाची एकच शंका होती; आम्हाला आता कितपत जमेल? डावाला सुरवात झाल्यावर प्रत्येकजण चाचपडत खेळू लागले. राजा राणीचे किती मार्क्स, बेझिक काय, राण्या आडव्या ठेवायच्या का उभ्या इत्यादी मूलभूत प्रश्न आधी पडले. पण हळूहळू दुसऱ्या तिसऱ्या डावात मंडळी भलतीच फॉर्ममध्ये आली. आणि बेझीकचा खरा रंग भरला. शोभाने तर कमालच केली. आता बेझिक जास्त काही आठवत नाही असे म्हणत म्हणत एका क्षणी अशी खेळी केली व डाव जिंकून दिला. बेझीकचा माहोल परत एकदा जमला होता. रोनिका व रंजन आमचा हुरूप वाढवण्यास आणि तहान भूक भागवण्यास तत्पर होतेच. तेव्हा एका हातात पत्त्याची पाने तर दुसऱ्या हातात खाणे अशी आमची अवस्था होती.

कोठल्याही गोष्टीचा शेवट असतो तसेच आजच्या बेझिक डावाची सांगता झाली. मी बाजूला बसलो होतो. कोणीतरी माझ्या हातात मार्कर आणून दिले. मार्करवरचे सर्व काटे शून्यावर होते. माझीही अवस्था शून्यवत झाली होती. पु. लं.च्या शब्दात सांगायचे तर, ''कधी कधी पाठीला डोळे फुटतात, त्यात काचांच्या फुटक्या तुकड्यात खूप प्रतिबिंबे लखलखावी तशी ही जिव्हाळ्याची दिवंगत माणसे दिसावयास लागतात. जीव एवढा एवढासा होतो'', आई, बाबा, मामा, मामी, आजी दिसू लागले. थोडेसे उदास वाटायला लागले. डोळे थोडे पाणावले. पण आता त्याच्या जागी आमचे चेहरे दिसावयास लागले. मग जाणीव झाली, जसे या लोकांनी आमच्यात बेझीकची मुळे अप्रत्यक्षरित्या रुजवली तोच प्रयत्न आम्हाला पुढच्या पिढीसाठी करावयास हवा. नव्हे ते आमचे कर्तव्यच आहे. आमच्या पुढील पिढीला हा खेळ सुपूर्द करण्याची वेळ आली आहे. मला खात्री आहे ही पिढी तेवढीच तत्परता दाखवेल. बेझीकच्या खेळात रस दाखवेल.

असो, हा परभांचा खेळ असाच अविरत चालू राहो ही एका सोकाजीची प्रार्थना।

*

# एक मजेशीर संध्याकाळ

-सुजन राणे (कॅलिफोर्निया)

चार पाठारे प्रभू एकत्र आले की खाणं, पिणं, आणि हसाहशी अशा वातावरणात कसा वेळ जातो कळत नाही. अशी एक संध्याकाळ कैलिफोर्नियाच्या फ्रिमाँट भागात २२ एप्रिलला अनुभवायला मिळाली. त्याची मजा काय और होती. मुलं मिळून आम्ही सर्व २५ एक पाठारे प्रभू होतो. गम्मत म्हणजे आमचे होस्ट अमोघ कोठारे प्रत्येकाचं स्वागत असं काही हसून करत होते की गेल्या कित्येक वर्षात मी कोणाला असं हसताना पाहिलं आणि ऐकलंसुद्धा नाही. शेवटी मी त्यांना बोललो, 'तुमचं नाव हसमुख असायला हवं होतं.' त्यावरसुद्धा ते येवढे दिलखुलास व मोठ्याने हसले की क्या बात है. मला मनापासून त्यांचं हसणं आवडलं. असं वाटलं माणसानी असं हसावं.... की त्याच्या आजुबाजुच्यांचं दु:ख कितीही मोठं असलं तरी ते क्षणात विसरलेच पाहिजेत. केव्हा केव्हा असं वाटते की या टेक्नोलॉजीच्या युगात लोक कमी हसतात की काय, का विचार करून हसतात. असो, पण दिलखुलास हसणं हे जगण्याला निराळी झालर देते. आता हे सर्व पाठारे प्रभू कोण होते याचा थोडक्यात उल्लेख आवश्यक आहे असं मला वाटते. होस्ट अमोघ हे विलेपार्ल्याच्या दीपक कोठारे यांचे चिरंजीव. तर या गमतीदार घोळक्यात इंग्लंडच्या एसेक्स प्रांतातून डॉ. अश्विनीकुमार व डॉ. गीता धैर्यवान, मुंबईच्या रंजन व शोभा विजयकरांचे चिरंजीव जयदेव व त्यांची बायको, अजित व नेत्रा विजयकरांचे चिरंजीव अभिजीत व बायको, नॉर्थ कारोलिनाच्या मीना विजयकरांचे चिरंजीव अमित राणे व बायको, कैलिफोर्नियाचे तुषार व मेधा कोठारे, शरद राव, माझी मुलगी मोनिका व जावई रवी, व शेवटी न्यू जर्सीहून माझी बायको नीलिमा व मी स्वत:.

आमच्या होस्टने जेवणाच्या बाबतीत आमची चंगळ केली होती. मटण, कोंबडी, कोलंबी, नॉन-व्हेज पुलाव, व्हेज-पुलाव, छोले, असे इतके प्रकार केले होते की मी काय खाल्लं ते मलाच आठवत नाही. असो. पण आपली जात ही अशी काय जमात आहे की तिला मजा कशी करावी, जीवनातला आनंद कसा लुटावा, भरपूर कसं हसावं हे शिकवावं लागत नाही, ते तिच्या अंगवळणी पिढ्यांपिढ्या चालत आलं आहे. परंतु आम्ही नुसता हाच दृष्टिकोन अवलंबला नाही. शिक्षण व कला या क्षेत्रातसुद्धा आम्ही अग्रगण्य आहोत याचा मला अभिमान आहे. येवढी लहान जात असून आमचे पाठारे प्रभू अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, न्यूझीलंड, साऊथ आफ्रिका व युरोपियन राष्ट्रात विखुरलेले असून चांगल्या हुद्यावर आहेत. यावरून आपली जात खचितच प्रगतिशील आहे असं म्हटलं पाहिजे. इंग्लंडच्या डॉ. अश्विनीकुमारने प्रसिद्ध गाणारे राजन साजन मिश्रा यांच्याकडे तालीम घेतल्यामुळे त्यानी त्यांच्या तयारीचा नमूना सादर केला. आम्हीसुद्धा थोडं नाट्यसंगीत गाऊन सगळ्यांचं मनोरंजन केलं. अशा परिस्थितीत गेलेल्या काळाचा व येणाऱ्या काळाचा विचार करण्याचा मोह आवरत नाही. गेल्या शतकात आपल्या जातीने डॉ. एम्. आर्. जयकर व वेलकरांसारखे राष्ट्रीय पातळीवर पुढारी दिले. लोकमान्य टिळकांनी स्वत: वकील असूनसुद्धा कायद्याच्या बाबतीत जयकरांचा सल्ला घेतला होता, तसंच वेलकरांनी टिळकांच्या बरोबर राजकारणात कार्य केल्याचा उल्लेख आहे. पुढच्या ५० वर्षात इथल्या पाठारे प्रभूंच्या पुढच्या पिढीतले काही तरूण नक्कीच अमेरिकन राजकारणात भाग घेतील यांत शंका नाही, कारण तोपर्यंत ते पूर्णत: अमेरिकन झालेले असणार. असं असताना, जर ओबामासारखा एक अमेरिकन निग्रो अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष होऊ शकला तर अमेरिकन पाठारे प्रभू त्या देशाचा राष्ट्राध्यक्ष का होऊ नये? कदाचित ही अपेक्षा हास्यास्पद वाटेल पण त्यात गैर काय आहे? मला सांगायला अभिमान वाटतो की वरचा पाठारे प्रभूंचा ग्रुप माझ्या मुलीने-मोनिकाने तयार केला. तशा प्रकारे इतर देशांत असे ग्रुप तयार झाले तर आपण पाठारे प्रभू त्या त्या देशांत किती जवळ येऊ.

राम राम मंडळी.

## परीक्षेतील सुयश

**बारावी (आर्टस्)**

कु. आदिती सचिन विजयकर ८० टक्के

**बारावी (सायन्स)**

श्री. कृतार्थ मोहनीश शेटचे (कार्यकारी संपादिका भक्ती प्रधान यांचे चिरंजीव)

**डॉक्टर ऑफ ऑस्टिओपाथिक मेडिसीन, (पेनिसिल्हेनिया, अमेरिका)**

कु. नीती अंजन विजय कोठारे

**बॅचलर ऑफ फाईन आर्टस् (अप्लाइड आर्टस्), (मुंबई विद्यापीठ)**

कु. वैजयंती विश्वास अजिंक्य

वैजयंतीने सत्यम अ‍ॅकेडमीचा बेसिक फोटोग्राफीचा कोर्स पूर्ण केला. आता तिची 'एक टाइप/व्हाईट क्रो डिझाईन्स' या सुप्रसिद्ध कंपनीत कन्नडा कॅलिग्रॅफी आणि टायफोग्राफीवर काम करण्यासाठी 'टाईप डिझाईन इंटर्न' म्हणून निवड झाली. ती १० मीटर एअर पिस्तुल शूटिंगच्या गटात राष्ट्रीय पातळीवरील नेमबाज आहेच. वैजयंतीचे अभिनंदन.

**एम्. टेक (सॉफ्टवेअर इंजिनीअरिंग), पिलानी (राजस्थान)**

श्री. निहार योगेंद्र विजयकर

**पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन मॅनेजमेंट इन मीडिया अँड कम्युनिकेशन**

**PGDA(AICTE)**

कु. करिष्मा अजय जयकर A+ ग्रेड

कु. करिष्मा २०१७ या शैक्षणिक वर्षाची 'स्टुडण्ट ऑफ द इयर' म्हणून गौरविली गेली. 'बॉम्बे मिरर' मध्ये तिच्या फोटोसह ही बातमी प्रसिद्ध झाली. अभिनंदन.

*

## पत्रप्रतिक्रिया

मी, सौ. अचला सुभाष देसाई, माझ्या मैत्रिणीचे पत्र देत आहे. आपला अंक ती नेहमी वाचते व आपल्या ग्रुपमध्ये वाचून दाखवते. असाच एक अनुभव तिच्याच शब्दांत-

संपादिका, प्रभुतरुण

माझं नाव सौ. नीला गडकरी. मी ठाण्याच्या हिरानंदानी इस्टेटमध्ये राहते. माझी मैत्रीण सौ. अचला देसाई हिने मला आपल्या समाजाचा प्रभुतरुण दिवाळी अंक २०१६ दिला. मी तो पूर्णपणे वाचला. खरंच अतिशय सुंदर कविता, अनुभव, प्रवासवर्णन मला वाचायला मिळाली.

त्यातल्या एका प्रवासवर्णनाने मी खूप प्रभावित झाले. तो लेख मला आवडला व ते वर्णन कुठेतरी जाऊन सांगावं असं वाटलं. ती लेह-लडाखची ट्रीप होती. योगायोगाने आमचा साहित्याचा ग्रुप 'विचारशलाका' आहे. त्यात आमच्या १०-१२ जणींचा सहभाग आहे. महिन्यातून एकदा वेगळा विषय घेऊन आम्ही बोलतो. मी सौ. बागेश्री धुरंधर परीख यांचा लेख वाचून दाखवला. आमच्यापैकी अशी ट्रीप अजून कुणी केली नव्हती. त्यामुळे सगळ्यांनी ही ट्रीप खूप एन्जॉय केली व कडाडून टाळ्या पडल्या. मी लगेच अचलाला फोन करून ही गोष्ट सांगितली व तिने मला पत्र लिहिण्यास सांगितले.

आमच्या ज्ञातीत (सी.के.पी.) सुद्धा अशी मासिके निघतात व खूप छान असतात. मला प्रभुतरुणाचा दर्जा तितकाच आवडला. त्यामुळे तिने सांगितल्याबरोबर मी हे पत्र लिहिले.

असेच चांगले लेख आपल्याकडून वाचायला मिळतील अशी आशा आहे.

जयहिंद - जय महाराष्ट्र!

आपली हितचिंतक,
नीला गडकरी

(प्रा. श्रीकांत मलुष्टे यांचे आत्मचरित्र यावर्षी प्रकाशित झाले. त्यात पार्ले कॉलेज (आजचे साठ्ये महाविद्यालय) बद्दल लिहिताना गुणी, सुंदर, अभिनेत्री म्हणून बागेश्री धुरंधर या विद्यार्थिनीचा उल्लेख आहे. बागेश्रीताईंचे अभिनंदन.

-संपादक)

*

## पाठारे प्रभु महिला समाज

रविवार दि. १६ एप्रिल २०१७ रोजी ४ वाजता पाठारे प्रभु महिला समाजाचा चैत्रातील वासंतिक हळदीकुंकू समारंभ पाठारे प्रभु हाऊसिंग सोसायटीच्या सांस्कृतिक केंद्रात, खार (प.) येथे साजरा करण्यात आला. सर्व भगिनींचे स्वागत पल्लवी कोठारे व नीता सेंजित यांनी केल्यानंतर फॅन्सी ड्रेस स्पर्धा, मराठी व हिंदी वक्तृत्व स्पर्धा, कलात्मक पाककृती स्पर्धा, रांगोळी स्पर्धा आणि चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या. रांगोळी व चित्रकला/स्पर्धांचे परीक्षण कुटुंब न्यायालयाच्या माजी न्यायाधीश सौ. बागेश्री धुरंधर पारीख यांनी केले तर; फॅन्सी ड्रेस, वक्तृत्व स्पर्धा आणि कलात्मक पाककृती स्पर्धेचे परीक्षण उर्वशी धराधर व वंदना नवलकर यांनी केले.

सर्व उपस्थित भगिनींना समाजातर्फे हळदी कुंकू, बत्तासे, चणे, गजरे, अंबाडाळ व पन्हे देण्यात आले. छाया विजयकरांकडचे गजरे होते. तर बिंबा नायक व गौरी नायक यांनी स्वादिष्ट आंबाडाळ व सुमधुर थंडगार पन्हे यांची व्यवस्था पाहिली.

समाजाच्या अध्यक्षा नीता सेंजित यांनी बागेश्रीताईंचा शिक्षणाव्यतिरिक्त कथा कलंदर कलावंत आहेत असा परिचय करून देऊन त्यांना भेटवस्तू देऊन सन्मानित केले. बागेश्रीताईंनी स्पर्धकांचे अभिनंदन करून आपले मनोगत व्यक्त करताना पाठारे प्रभु भगिनी कलाकौशल्यात प्रवीण असूनही स्पर्धेत फार कमी संख्येने भाग घेतात याबद्दल खंत व्यक्त केली. त्यांच्या हस्ते सर्व स्पर्धकांना पारितोषिके देण्यात आली. छाया विजयकरांनी त्या दिवशी आलेल्या देणग्या वाचून सर्वांचे आभार मानले. सर्व उपस्थित भगिनींनी देवीची आरती केल्यानंतर कार्यक्रम संपन्न झाला. त्या दिवशी आलेल्या विशेष देणग्या- आसावरी साळवी देसाई कडून १ लाख रु.ची देणगी व आशा विनोद कोठारे यांच्याकडून वडील कै. कमलकांत कोठारे यांच्या १०१ व्या जयंती निमित्त दहा हजार रु.ची देणगी. परीक्षक बागेश्री धुरंधर पारीख यांनी 'लेककलर्स' सफेद रांगोळीत वापरून ''शेड् लॅन्डस्केप' रांगोळीचे आकर्षक प्रात्यक्षिक भगिनींना दाखविले.

स्पर्धांचे निकाल पुढीलप्रमाणे-

१) फॅन्सी ड्रेस स्पर्धा - अ गट लहान मुलींसाठी (१५ वर्षांखालील मुली)
प्रथम क्रमांक - कुमारी आदिती आशीश व्यवहारकर
द्वितीय क्रमांक - कुमारी चैतन्या नितीश कीर्तिकर
तृतीय क्रमांक - कुमारी वैष्णवी रितेश वाझकर
ब गट - महिलांसाठी ( १५ वर्षांवरील भगिनी)
सौ. मीना धराधर आंबवणे - समाजाचे बक्षीस

२) वक्तृत्व स्पर्धा- मराठी. मुलींसाठी (१५ वर्षांखालील)
विषय - कविता
प्रथम क्रमांक - कुमारी किमया अपूर्वा कोठारे
द्वितीय क्रमांक - कुमारी आदिती आशीश व्यवहारकर
तृतीय क्रमांक विभागून - कुमारी वैष्णवी रितेश वाझकर व कुमारी चैतन्या नितीश कीर्तिकर
महिलांसाठी (१५ वर्षावरील)
विषय - शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ
प्रथम क्रमांक - सौ. मीना धराधर आंबवणे
द्वितीय क्रमांक - सौ. स्वप्ना विनीत जयकर
तृतीय क्रमांक - श्रीमती हेमा रामचंद्र जयकर

३) वक्तृत्व स्पर्धा - हिन्दी - महिलांसाठी
विषय - मेहनत का फल मिठा
सौ. स्वप्ना विनित जयकर - समाजाचे बक्षिस

४) कलात्मक पाककृती स्पर्धा
विषय - सजावटीसह रुखवत
प्रथम क्रमांक - श्रीमती रजनी विनोद तळपदे
द्वितीय क्रमांक - सौ. विद्या विजय त्रिलोकेकर
तृतीय क्रमांक - श्रीमती हेमा रामचंद्र कोठारे

५) रांगोळी स्पर्धा -
विषय - धान्याची रांगोळी
प्रथम क्रमांक - सौ. विद्या विजय त्रिलोकेकर
द्वितीय क्रमांक - सौ. रजनी विनोद तळपदे
तृतीय क्रमांक विभागून - सौ. अस्मिता सलील नायक / श्रीमती हेमा रामचंद्र जयकर

६) चित्रकला स्पर्धा
अ - गट - ५ ते ८ वर्ष
विषय - आयत्या वेळी दिलेले चित्र क्रेयॉन कलरने रंगविणे
प्रथम क्रमांक - कुमारी आकांक्षा प्रसाद कोठारे
द्वितीय क्रमांक - कुमारी मोहना मनिष कोठारे
द्वितीय क्रमांक विभागून - कुमारी आदिती आशीश व्यवहारकर / कुमारी वैष्णवी रितेश वाझकर

*

## बालविभाग

### Bumpy Ball

Bumpy ball bumps - bumps,
Every-where it runs-runs.
In a corner it runs and hides,
Bumpy ball then nobody finds.
All other toys sit in the basket,
Bumpy ball, jumps in a bucket.
Takes a bath, then comes out,
Bumpy ball is small but stout,
Throw and catch, throw and catch,
Bumpy alone plays the match.
Bumpy once ran very far,
In a rat's hole, behind a car.
Monty searched and searched every-where,
"Bumpy, bumpy, are you there?"
Rat's kids now, play with the ball,
Monty still gives Bumpy a call.

**Dr. Suman Navalkar**

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणास देणगी

* सौ. सुप्रिया उमेशचंद्र कीर्तिकरकडून रु. १००१/-
* श्री. संदीप प्रबोध देसाई आणि सौ. स्वाती संदीप देसाई यांजकडून त्यांची कन्या दीप्ती हिचा नारळसाखर झाल्याबद्दल रु. १०००/-
* श्रीम. वृंदा शाम जयकर यांजकडून श्री. प्रशांत मोहनलाल राणे यांच्या साठाव्या वाढदिवसाप्रीत्यर्थ (३ जून २०१७) रु. १०००/-
* श्री. अंजन विठ्ठल कोठारे आणि सौ. मीता अंजन कोठारे यांजकडून त्यांचा मुलगा अक्षय याच्या २५ व्या वाढदिवसाप्रीत्यर्थ रु. ५०१/-
* कै. रमेश गजानन जयकर यांच्या सहाव्या स्मृतिदिनानिमित्त श्रीम. मीना रमेश जयकर आणि परिवाराकडून रु. ५०१/-
* श्री. शैलेंद्र एस्. धुरंधरकडून आजीव सदस्यत्व रु. ५००/-
* श्री. प्रताप मोतीराम वेलकर यांजकडून रु. २००/-

सर्व देणगीदारांचे आभार.

## अभिनंदन

* मुंबई विद्यापीठाला या वर्षी १५० वर्षे पूर्ण झाली. (१८५७ ते २०१७) 'टॉवर ऑफ विझडम' हा छायाचित्रांचा संग्रह मुंबई विद्यापीठाने या निमित्ताने प्रकाशित केला. त्यात १९२१ सालचे महात्मा गांधींचे स्वलिखीत पत्र हस्ताक्षरात आहे. हे पत्र १९२० साली लोकमान्य टिळक गेल्यानंतर आपल्या ज्ञातीतील टिळकभक्त डॉ. मोतीराम बाळकृष्ण वेलकर यांना लिहिलेले आहे. त्यात स्वातंत्र्य चळवळ, बहिष्कार चळवळ आदींचा उल्लेख आहे. 'टॉवर ऑफ विझडम' मध्ये हे पत्र विद्यापीठाने संग्रहीत केले; ही आपल्या ज्ञातीला अभिमानास्पद बाब आहे.
* कु. ख्याती तेज प्रताप वेलकर यांची श्री सायरस मिस्त्रींच्या 'शापुरजी पालनजी डेव्हलपमेंट कंपनी'त आर्किटेक्ट प्लानर म्हणून नेमणूक झाली. अभिनंदन.

## पत्रप्रतिक्रिया

प्रिय संपादक,

सौ. उज्ज्वला र. ब्रम्हांडकर यांची क्लोनिंग या अत्याधुनिक विषयावरची कथा वाचली. मी स्वत: वैद्यकीय व्यवसायात असल्याने मला कथेचा विषय फारच उचित वाटला. शिवाय कथा अतिशय परिणामकारकरित्या हाताळली आहे, त्यामुळे विषय आणि कथा दोन्हींचा एकमेळ झाला आहे. एरवीही प्रभुतरुणातून येणारे त्यांचे 'कथाकली' सदर मला नेहमीच आवडते. पण या कथेची खास पत्र पाठवून दखल घ्यावीशी वाटली.

कळावे.

आपली,
डॉ. सुरेखा धुरंधर

## पाठारे प्रभू सोशल समाज

पाठारे प्रभू सोशल समाजाची १६ जुलै १७ रोजी खोपोली येथे वर्षासहल आयोजित केली आहे. इच्छुकांनी सोशल समाजाच्या कार्यकर्त्यांशी संपर्क साधावा.

* 'प्रभुतरुण'च्या संपादिका प्रा. सुहासिनी कीर्तिकर यांच्या एप्रिलमध्ये झालेल्या वाढदिवसाप्रीत्यर्थ 'प्रभुप्रभात'तर्फे शुभेच्छापत्र प्राप्त झाले. आभार.

## प्रभुतरुणाची डायरी

### कुर्यात् बटोर्मंगलम्

| | |
|---|---|
| ३०-४-१७ | चि. विहान श्रीनल कोठारे |
| ३०-४-१७ | चि. इशान अमित तळपदे |
| ३०-४-१७ | चि. अश्विन असित तळपदे |
| ३०-४-१७ | चि. धीरेन सिद्धेश अजिंक्य |
| ११-६-१७ | चि. अथर्व नीलेश झावबा |

### नारळ साखर दिला

| | |
|---|---|
| २८-४-१७ | श्री. वीरधवल दीपक तळपदे, कु. दीप्ती संदीप देसाई |
| १८-५-१७ | श्री. हर्षल उदय मानकर, कु. कौमुदी सुश्रुत राणे |

### नांदा सौख्यभरे

| | |
|---|---|
| १७-४-१७ | डॉ. सोहेल नृपाल कोठारे, डॉ. पूर्वा कानविंदे (आं. ज्ञा.) |
| १३-५-१७ | डॉ. मोनिका मिलिंद अजिंक्य, डॉ. सॅम्युअल रॉशनर (आं. ज्ञा.) |

### विवाह सुवर्ण महोत्सव

| | |
|---|---|
| ०२-६-१७ | श्री. सुरेश मनोहर विनायक नवलकर, सौ. सुरेखा सुरेश मनोहर नवलकर (कु. सुरेखा बाबुराव व्यंकटराव राणे) |

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| ०४-४-१७ | श्रीम. मीना बाळकृष्ण धुरंधर, | वय ८९, | बोरीवली |
| १७-४-१७ | श्रीम. अमला सुधीर कोठारे, | | कांदिवली |
| १७-४-१७ | श्री. शंकरराव गजानन त्रिलोकेकर, | वय ८६, | खार |
| २७-४-१७ | श्रीम. उल्का शामसुंदर धराधर, | वय ७७, | अंधेरी |
| २७-४-१७ | सौ. रश्मी रजनीकांत देसाई, | वय ७७, | कांदिवली |
| ०४-५-१७ | श्रीम. प्रतिभा राजे (पूर्वाश्रमीच्या लैला केशवराव देसाई), | वय ८०, | विलेपार्ले |
| १०-५-१७ | श्रीम. कस्तुर बाळाराम कोठारे, | वय ८७, | अंधेरी |
| ०६-६-१७ | सौ. अनुराधा विनोद धुरंधर | वय ८१, | विलेपार्ले |
| ०६-६-१७ | सौ. रेखा विलास कीर्तिकर | वय ८१, | वाशी |

## THE PATHARE PRABHU CHARITIES

***Award of Educational Merit Prizes for the year 2017***

The Pathare Prabhu Charities have been awarding Educational Merit Prizes every year to students of our community passing various examinations with merit.

Students passing any examination SSC/CBSE/ICSE/IGCSE onwards from a recognized university/educational institution during this year are earnestly requested to submit the photo copies of their mark sheets in the office of the Pathare Prabhu Charities, Thakurdwar, between 11.00 a.m. and 5.30 p.m. after the result of the examination is declared but not later than September 16, 2017 to enable the trustees to award the prizes to the eligible students. The students and parents concerned should note that the merit prizes will be awarded by the trust only on the basis of the result/mark sheets received by the Trust before the dead line.

This year the Annual Educational Merit Prize Awards Function will be held on Sunday December 10, 2017 at M.V.M. Degree College of Commerce & Science Mogaveera Bhavan, MVM Educational Campus Marg, Off Veera Desai Road, Andheri West, Mumbai - 400058.

Students are requested to furnish the following requirements along with the examination result/mark sheet.

1. Full Name of the student (Married Female to give maiden name also)
2. Latest coloured photo of the student, postcard size with light background and name of the student written on the back side of the photo.
3. Full Postal Residential Address
4. Telephone No.
5. Email address if available
6. Confirmation regarding student having bank account : Yes/No.
7. Name of Grand father
8. Bio data in brief (past record of academic career)
9. Confiramtion whether the student will receive the prize if awarded, by his/her personal attendance at the function on the aforesaid date

## पाठारे प्रभु चॅरिटीज

४ जून, १७ रोजी सायंकाळी ५ वाजता चॅरिटीजची सभा सुरेश विठ्ठल मेमोरियल हॉलमध्ये अध्यक्ष श्री. उदय मानकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. मागील सभेचा अहवाल एकमताने मंजूर झाला. सद्य अहवालाविषयी विश्वस्त श्री. राजन जयकर यांनी विश्लेषण केले आणि तो अहवाल सभेपुढे चर्चेसाठी ठेवण्यात आला. श्री. अशोक तळपदे, श्री. नरेश मानकर, श्री. जयंत कीर्तिकर, प्रा. सुहासिनी कीर्तिकर यांनी मनोगत व्यक्त केले. सभेत उपस्थित केल्या गेलेल्या आक्षेपांना आणि प्रश्नांना विश्वस्त श्री. अजित विजयकरांनी समाधानकारक उत्तरे दिली. सभेला यावर्षी अधिक सभासद उपस्थित होते. नुतनीकरण केलेल्या सभागृहात झालेल्या या सभेत चिवडा-पेढ्याचे पाकीट आणि खास मसाल्याचे दूध देण्यात आले.

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

**संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर** RNI NO. 14613/67